**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**
**(A Goverment of Maharashtra Enterprise )**

क्रमांकःप्रशा/आस्था-५/प्र.क्र.५३४(१)/२०२४-२५/ 5066 नागपूर, दिनांक 28 MAR 2025

**परिपत्रक**

**विषय :- एफडीसीएम लिमीटेड मधील अधिकारी / कर्मचारी तसेच परसेवेवरील अधिकारी कर्मचारी यांना एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडची ग्रुप मेडीक्लेम पॉलीसी लागु करणेबाबत.**

एफडीसीएम लिमीटेड मधील अधिकारी, कर्मचारी तसेच परसेवेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडची** ग्रुप मेडीक्लेम पॉलीसी **दिनांक २९.०३.२०२५** पासुन दिनांक **२८.०३.२०२६** पर्यंत लागु करण्यात येत आहे.

**२.०** करिता, **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडशी** संलग्नीत असलेल्या दवाखान्यात जाऊन तात्काळ कॅशलेस उपचार करुन घेता येईल. कॅशलेस उपचाराच्या मदतीकरीता **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनीच्या** अधिकाऱ्याचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहे.

| **एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडची ग्रुप मेडीक्लेम पॉलीसी** | | | |
|---|---|---|---|
| १ | ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीचे संकेतस्थळ | www.sbigeneral.in | |
| २ | भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल | | |
| | **संपर्क अधिकाऱ्यांचे नांव** | **ई-मेल** | **भ्रमणध्वनी क्रमांक** |
| १. | श्री. अभिजित पर्वते | abhijit.parvate@sbigeneral.in | 9689896939 |
| २. | श्री. विकास देवरे | vikas.deore@sbigeneral.in | 7507772857 |
| ३. | श्री. सौरभ जैन | saurabh.jain@sbigeneral.in | 7066310988 |

**३.०** आपल्या कार्यालयात व आपल्या अधिनस्त विभागीय कार्यालयात एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडच्या ग्रुप मेडिक्लेम पॉलीसीच्या संदर्भात **' संपर्क अधिकारी '** म्हणून नियुक्ती करावी. नियुक्ती केलेल्या संपर्क अधिकाऱ्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था करावी. व त्यासंबंधीची यादी दिनांक ०१.०४.२०२५ पर्यंत या कार्यालयास न चुकता सादर करावी.

**४.०** काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये आपण नियुक्त केलेल्या संपर्क अधिकारी मार्फतच वैद्यकीय देयकांबाबत शंका असल्यास या कार्यालयास संपर्क साधावा.

**५.०** तसेच, कोणत्याही कारणास्तव (जसे की, विवाह, नवनियुक्ती, नवजात बाळाचे नाव इत्यादी) कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांचेवर अवलंबून असलेले कुटुंबिय सदस्यांचा (Dependent) नव्याने समावेश करावयाचा असल्यास, या कार्यालयास आपल्या नियंत्रक अधिकाऱ्यामार्फत त्वरीत कळविण्यात यावे. तसेच याप्रकरणी निष्काळजीपणामूळे विलंब झाल्यास सदरील प्रकरणी सादर केलेले वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती ही कोणत्याही परिस्थितीत (एफडीसीएमच्या अंतर्गत स्त्रोतातून सुध्दा) अनुज्ञेय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**६.०** कोणत्याही परिस्थितीत दिनांक २९.०३.२०२५ पुर्वीचे वैद्यकीय बिल हे **१५ एप्रिल २०२५** पर्यंत एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनीच्या प्रतिनिधीकडे सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी.

**७.०** महाराष्ट्रातील जिल्हयातील एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेडशी संलग्नीत दवाखान्याची यादी तसेच इतर राज्यातील दवाखान्याची यादी www.sbigeneral.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**८.०** एफडीसीएम लिमीटेडने प्रति अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता मागील वर्षीची रु. ३.०० लक्ष प्रतिपूर्ती खर्चाची रक्कम मर्यादेमध्ये वाढ करुन या वर्षी रु. ४.०० लक्ष करण्यात आलेली आहे. रु. ४.०० लक्ष यापेक्षा जास्त खर्च झाल्यास उर्वरीत रक्कम कार्पोरेट बफर मधून देण्याकरीता या कार्यालयाची लेखी स्वरुपात पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

९.० सदरील मेडिक्लेम ग्रुप पॉलीसीकरिता अधिकारी/ कर्मचाऱ्यांसह त्यांचेवर अवलंबून असलेले कुटुंबिय सदस्य (Dependent Member) यांना या पॉलीसीचा लाभ घेता येईल. (पॉलीसी संलग्नीत करतेवेळी कर्मचारी / अधिकारी यांनी लिहून दिलेले Dependent Member) यासोबतच वार्षिक आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध आहे. याकरीता एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेड तर्फे प्रत्येक कार्यालयात येऊन अधिकारी / कर्मचारी यांची तपासणी केली जाईल.

१०.० उपरोक्त नमुद संपुर्ण माहिती ही प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांचेपर्यंत पोहचविण्याची कार्यवाही आपले स्तरावरुन करण्यात यावी.

सहपत्र - वरीलप्रमाणे (ई-मेल व्दारे)

***व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमीत***

(डॉ. टि.ब्युला एलिल मती)
**महाव्यवस्थापक (मुख्यालय)**

प्रति,

महाव्यवस्थापक
एफडीसीएम लिमीटेड
नागपूर, प्रदेश नागपूर.

प्रादेशिक व्यवस्थापक
एफडीसीएम लिमीटेड (सर्व)

प्रतिलीपी :- विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड (सर्व) यांना सहपत्रासह माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रतिलीपी :- एस.बी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेड यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रतिलीपी :- व्यवस्थापकीय संचालक कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी (सर्व) तसेच कक्ष प्रमुख (सर्व)

प्रतिलीपी :- सुचना फलक / एफडीसीएम अधिकृत संकेतस्थळ www.fdcm.co.in

**Registered Office** : FDCM Bhavan, 359/B, Hingna Road, Ambazari, Nagpur-440 036
**CIN:**U45200MH1974SGCO17206 **PAN:** AACF2982K **GST No.** 27AAACF2982K1ZD
**Ph.No.** 0712-2811905 **E-mail:**md@fdcm.nic.in **Website:** www.fdcm.co.in